# लोकसेवक



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क.

हरिजन आणि आदिवासी
यांचा महान् उद्धारकर्ता

IRBK-0106245

लेखक • अमरेन्द्र

# ठक्करबाप्पा

ठाणे, वाचनमंदिर

क्र. 6284 दि. ..........

वि. .......... क्र. ..........

## लोक-सेवक : १

•

जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥

अमरेन्द्र



IRBK-0106245

IRBK-0106245

किंमत ५० नये पैसे

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि. मुंबई २

प्रकाशक :

एम. के. वोरा, वोरा अॅन्ड कं. पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

लेखक :

अमरेन्द्र

आवृत्ति :

पहिली–१९५७

पानें :

बत्तीस

किंमत :

पन्नास नये पैसे

मुद्रक :

अ. चिं. रायरीकर, स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनवार पेठ, पुणें २.

देश स्वतंत्र झाला. अनेकांना वाटूं लागलें आहे कीं, आतां सेवेचें काम संपलें. पण ही समजूत अगदीं चुकीची आहे. सेवेची गरज स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी जितकी होती तितकी आजहि आहे. लक्षावधि भिल्ल, गोंड इत्यादि वनवासी अरण्यांतल्या अंधारांत चांचपडत आहेत. हजारों हरिजन माणुसकीला आंचवलेले आहेत. हे सारे आपले भाऊ आहेत. यांना माणसांत आणण्याचें काम आपलेंच आहे. तें काम कसें करावयाचें याचा धडा घालून दिलेला आहे. कै. ठक्करबाप्पा यांनीं तो घालून दिला आहे. गांधीजीहि म्हणतात कीं त्याच मार्गानें आपण गेलें पाहिजे. त्यासाठीं सेवावीर बनलें पाहिजे. ठक्करबाप्पा हे सेवावीरांचे आदर्श आहेत. शिकलेल्याला सेवावीर होतां येईल; तसेंच अशिक्षितालाहि होतां येईल. बाप्पांनीं भिल्ल कार्यकर्तेहि तयार केले आहेत. तशी इच्छा मात्र हवी.

# ठ क्क र बा प्पा

- ☆ बाप्पा आणि बापू
- ☆ सच्चा सेवक
- ☆ ईश्वराची इच्छा
- ☆ नवा प्रकाश
- ☆ संन्यास
- ☆ चार गुरु
- ☆ कामाचे डोंगर
- ☆ बाप्पा—एक संस्था
- ☆ कडक आणि कोमल
- ☆ असे सेवक हवेत



१

## बाप्पा आणि बापू

तेव्हां इंग्रज सरकारचें राज्य होतें. आपल्या देशांत आपणच परके झालों होतों. जणूं कांहीं आपण कुठून तरी बाहेरून आणून ठेवलेले गुलाम आणि इंग्रज लोक इथले मालक! ते सांगतील तें काम करायचें. आणि ते तोंडावर फेंकतील तो भाकरीचा तुकडा चघळून निमूट बसायचें. आपले कोणी भाऊबंद दु:खी कष्टी असले; जुलमाखालीं चिरडले, भरडले जात असले;

तरीं त्यांच्या मदतीला जाण्याची सोय नव्हती. इतकेंच काय, त्यांची बाजू घेऊन बोलणें म्हणजे इंग्रज सरकारच्या दृष्टीनें पाप होतें.

पण एकाला पाप तें दुसऱ्याला पुण्य! जसें चोराला चांदण्याची भीति, तर भल्या माणसाला त्याची तितकीच प्रीति. या आपल्या भारत देशांत त्या काळीं पुण्य जोडायला खूप वाव होता. देश स्वतंत्र करण्यासाठीं लढाई चालू होती. त्यांत भाग घ्यायचा म्हणजे एक केवढें मोठें पुण्य होतें. परंतु त्याशिवायहि अशा पुष्कळ गोष्टी होत्या. त्यांतली कोणतीहि एखादी गोष्ट हातीं घेऊन आयुष्यभर पुण्याचा केवढा तरी सांठा करतां आला असता. आजसुद्धां तशा गोष्टी नाहींत असें नव्हे. पण त्या डोळ्यांनीं पाहातां आल्या पाहिजेत. किंवा देवानें कृपा करून त्यांकडे बोट दाखविलें पाहिजे.

'बापू' म्हणजे महात्मा गांधी हे देशाच्या लढाईंत असें पुण्य जोडणारे फार मोठे पुण्यवान पुरुष. यांच्याचबरोबर दुसऱ्या एका थोर पुरुषाचें नांव घेतां येण्यासारखें आहे. हे बापू तर ते बाप्पा. त्यांचें सगळें नांव–अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर. पण त्यांना म्हणत ठक्करबाप्पा, किंवा नुसतेंच 'बाप्पा.'

गंमत अशी आहे कीं, बापूजी ज्या सालीं जन्मले त्याच सालीं बाप्पांचाहि जन्म झाला–सन १८६९ मध्यें. या वर्षीच्या २९ नोव्हेंबरला ठक्करबाप्पा जन्माला आले. त्यापूर्वीं सुमारें दोन महिन्यांचाच–२ ऑक्टोबरचा गांधीजींचा जन्म. बापू–बाप्पांचा जन्म जसा एकाच सालीं झाला, तसाच तो एकाच प्रांतांतहि झाला–सौराष्ट्रांत किंवा त्या काळच्या नांवानें सांगायचें तर काठेवाडांत. सौराष्ट्रामधील भावनगर हें बाप्पांचें जन्मगांव. तर बापूजींचा जन्म सौराष्ट्रांतील पोरबंदर या गांवचा.

ठक्करबाप्पांचे वडील विठ्ठलदास लोहाणा जातींतील एक थोर सेवक होते. भावनगरमध्यें त्यांनीं लोकांची फार मोठी

सेवा केलेली होती. १९०० सालीं त्या भागांत भयंकर दुष्काळ पडला. त्या दुष्काळांत त्यांनीं आपल्या शेंकडों जातबंधूंना अन्न देऊन जगवलें. शेंकडों भुकेले लोहाणा विठ्ठलदासांनीं चालविलेल्या अन्नछत्रांत दररोज जेवून जात. सार्वजनिक पैसा जमवून त्यांनीं हें काम कित्येक वर्षें चालविलें होतें. त्या जातींतील मुलांना मोफत शिक्षण मिळावें म्हणून त्यांनीं एक मोठी शाळाहि स्थापन केली होती. अनेक विद्यार्थी त्या शाळेच्या निवासांतच राहात व शिकत. अशीं कितीतरी गरीब मुलें त्यांनीं पोटापाण्याला लावलीं. पण इतकें सगळें केलें त्यासाठीं विठ्ठलदासांनीं पैसुद्धां घेतली नाहीं. तें बिनमोबदल्याचें सार्वजनिक काम. म्हणून त्यांत त्यांनीं कधीं आळसहि केला नाहीं. कारण ते त्याला आपलें कर्तव्यच समजत. त्यांत त्यांची उपकाराची भावना नव्हती. आणि त्यांतहि कामाची सगळी व्यवस्था कशी चोख. पैशाअडक्याच्या बाबतींतलें त्यांचें स्वतःचें वर्तन कसें धुतल्या तांदुळासारखें स्वच्छ.

:

## सच्चा सेवक

अशा बापाचा अमृतलाल हा मुलगा. तो ‘ बापसे बेटा सवाई ’ निघाला नसता तरच नवल ! सेवेच्या हवेंतच तो वाढला. सेवेचेंच बाळकडू त्याला मिळालें.

—पण खरें म्हटलें तर सेवा म्हणजे तरी काय ? दुसऱ्यासाठीं कांहींतरी करीत राहाणें म्हणजे का सेवा ? मग नांगराचा बैल आणि टांग्याचा घोडा तर दिवसभर दुसऱ्यासाठींच काम करीत असतो. पण तो तें मनापासून करतो का ? आसुडाचा फटकार आणि तोंडांतल्या लगामाचे कांटे नसले तर हीं जनावरें करतील का काम ? म्हणजे ही कांहीं सेवा नव्हे तर. तसेंच पैसे घेऊन दुसऱ्यासाठीं कष्ट करणारांचें. जोंवर दाम तोंवर काम. हीसुद्धां कांहीं सेवा नव्हे. आणि असें म्हटलेलेंहि नाहीं

का ? 'मोलें घातलें रडाया। कैंचे आंसु आणि माया ।।' तेव्हां, भीतीनें केलेलें, पैशासाठीं केलेलें, नाइलाज होऊन केलेलें काम म्हणजे सेवा नव्हे. मग तें दुसऱ्यासाठीं केलेलें असलें तरी ती सेवा म्हणतां यायची नाहीं. खरी सेवा ती कीं जी आपण होऊन केलेली असते. आपल्याला त्यांतून कांहीं मोबदला मिळेल अशी आशा न ठेवतां केलेली असते. अगदीं मनापासून आणि आनंदानें केलेली असते. खरे थोर सेवक जे असतात ते त्याला सेवाहि म्हणत नाहींत. ते म्हणतात, 'हें माझें कामच आहे; कर्तव्यच आहे.' त्यांना कोणी सांगितलें म्हणून नव्हे. त्यांना कोणावर उपकाराचें ओझें लादायचें असतें म्हणून नव्हे. कोणी त्यांना त्याबद्दल चार चांगल्या शब्दांनीं भलाई देईल म्हणूनहि ते ही सेवा करीत नसतात. तें काम—ती सेवा—करण्यांत त्यांना आनंद वाटतो. तें काम आपण केलेंच पाहिजे असें त्यांचें मन त्यांना सांगत असतें. म्हणून ते तें काम करीत राहातात.—अखंड, सतत. बस, मग तुम्ही सेवा म्हणा नाहींतर आणखी कांहीं म्हणा. त्यांचें तुमच्या या म्हणण्याकडे लक्षसुद्धां नसतें. स्वतः वाहात राहून जगाला अन्नपाणी देणारी नदी कुठे तुम्हांला विचारायला येते ? तुम्ही तिला चांगलें म्हणतां का तिच्यावर रागावतां !

पण असे खरे सेवक, सच्चे सेवक फार थोडे असतात. —फारच थोडे. अगदीं हाताच्या बोटावर मोजण्यासारखे. आपण तुकाराम, रामदास यांचीं जीं नांवें घेतों ते सन्त असे होते. अलीकडच्या काळांतहि असे कांहीं सच्चे सेवक आपल्या देशाला लाभले. अशा एका सच्च्या सेवकाची ही गोष्ट आहे. ही हकीकत आहे.

आपल्याला गांधीजींचें नांव ठाऊक आहे. तसेंच लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचन्द्र यांचींहि नांवें चांगलीं माहीत आहेत. पण इथे ज्यांची गोष्ट सांगायची आहे त्यांचें नांव आपल्यापैकीं फार थोड्यांना माहीत असेल. तें खेड्यापाड्यांतल्या माणसांना माहीत नसेल यांत नवल नाहीं. शहरांत,

अगदीं मुंबईसारख्या मोठ्या शहरांत राहाणारांपैकींहि फारच थोड्या लोकांना त्यांची माहिती असेल. याचें कारण आहे. कारण अगदीं साधें आहे. त्यांचें काम कसलाहि गाजावाजा न करतां चालत असे.

पण असें असलें तरी मी तुम्हांला सांगतों. कीं, गांधीजी किंवा नेताजी यांना आपण जसे मोठे मानतों तसेच हे बाप्पाहि फार मोठे होते. फरक इतकाच कीं त्यांचें काम निराळ्या प्रकारचें होतें. तुकाराम महाराजांनीं म्हटलें होतें ना, " उरलों उपकारापुरता "—तसेच हे बाप्पाहि. खरोखरीच वयाच्या ४४ व्या वर्षापासून मरेपर्यंत ते ' उपकारापुरतेच उरले ' होते. ते वारले तेव्हां त्यांचें वय ८२ वर्षांचें होतें. म्हणजे जवळ जवळ अडतीस वर्षें ते केवळ याप्रमाणें लोकांसाठीं जगत होते. काय केलें त्यांनीं या एवढ्या वर्षांत लोकांसाठीं ?

तें तर सांगायचेंच आहे. पण त्याआधीं एक गोष्ट महत्त्वाची म्हणून पाहायला हवी आहे. या कामासाठीं त्यांची तयारी कसकशी होत गेली. त्यांच्या आयुष्याची नदी कोणत्या वळणावाकणांनीं वाहात गेली हें पाहायला हवें अगोदर.

## २
## ईश्वराची इच्छा

लहानपणचे बाप्पा म्हणजे एक हट्टी मुलगा होता. शाळेंत तर त्याला मुळींच जायला नको असायचें. पण एक गुण त्याच्याजवळ चांगला होता. एकदां एखादी गोष्ट त्याला पटली,त्याच्या मनानें घेतली कीं मग त्यांत तो अगदीं रमून जायचा. ती गोष्ट अगदीं मन लावून, खूप खपून पुरी करायचा. शाळेंतल्या अभ्यासाच्या बाबतींतहि तसेंच झालें. सुरुवातीला शाळा चुकवणारा आणि साधारण बुद्धीचा समजला जाणारा हा मुलगा होता. पण तो मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिला आला. त्याला कॉलेजच्या

शिक्षणासाठीं शिष्यवृत्तिहि मिळाली. पैशाची व्यवस्था झाली. आणि पैशाची व्यवस्था झाली म्हणूनच त्यांना पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजांत म्हणजे महाविद्यालयांत जाऊन शिक्षण घेतां आलें.

घरें बांधणें, सडका तयार करणें वगैरे-संबंधीचें शास्त्र ते इथे शिकले. विसाव्या वर्षी हें त्यांचें शिक्षण पुरें झालें. ते 'इंजिनिअर' बनले. शिक्षणाचा आखाडा सोडून संसाराची लढाई करण्यासाठीं तयार झाले.

तसें पाहिलें तर, त्या काळच्या रीतिरिवाजाप्रमाणें त्यांचें लग्न फार लहानपणींच झालेलें होतें. वयाच्या ११–१२ व्या वर्षींच लग्नाची माळ त्यांच्या गळयांत पडलेली होती. पण तेव्हां त्या बिचाऱ्या मुलाला लग्न म्हणजे काय हेंहि समजत नव्हतें. त्यांचें शिक्षण आटोपलें तेव्हां त्यांच्या घरची स्थितीहि तशी कांहीं बरी नव्हती. वडिलांनीं मोठ्या कष्टानें त्यांचें शिक्षण केलेलें होतें. आपल्या आईच्या अंगावरचे दागिने गहाण टाकून वडिलांनीं आपल्याला शिकण्यासाठीं पैसे दिलेले आहेत. ही जाणीव अमृतलालला होती. आणि त्याकरितां आईवडिलांच्या उतार वयांत आपण त्यांचे पांग फेडले पाहिजेत, हें त्याला कळत होतें.तितका समजूतदारपणा त्याच्या ठिकाणीं जरूर होता.

त्यामुळें त्यानें अधिक शिक्षणाची हांव बाळगली नाहीं. सरळ नोकरीची वाट धरली आणि त्याला ती लगेच मिळालीहि. बार्शी लाइट रेल्वेची लाईन टाकण्याचें काम त्या वेळीं चालू होतें. तिथे ओव्हरसीअर म्हणून त्यांना काम मिळालें. पगार होता दरमहा रुपये पंचाहत्तर. त्यानंतर काठेवाडमधील रेल्वेंत असिस्टंट-दुय्यम इंजिनीअर म्हणून ते गेले. त्यानंतर ते वढवाण राज्याचे मुख्य इंजिनीअर झाले. पोरबंदर संस्थानांतहि याच हुद्यावर त्यांनीं उत्तम काम करून नांव कमावलें. अशीं कामें करीत करीत वयाचीं ३० वर्षें झालीं. त्या वर्षीं त्यांना हिंदुस्थानाच्या

बाहेर जाण्याचा योग आला. १८९९ सालीं ते पूर्व आफ्रिकेंतील युगांडाच्या रेल्वेलाइनचें काम करण्यासाठीं गेले. तिकडून स्वदेशांत परत आल्यावर पुढल्याच वर्षी म्हणजे १९०३ सालीं त्यांची सांगली संस्थानांत नेमणूक झाली. तिथे ते मुख्य इंजिनीअर होते.परंतु तिथे त्यांचा स्वाभिमानी बाणा वरिष्ठांना रुचला नाहीं. त्यामुळें तिथेहि फार काळ त्यांना राहातां आलें नाहीं. पुढें त्यांना मुंबई नगरपालिकेच्या नोकरींत यावें लागलें. ही त्यांची शेवटचीच नोकरी. या नोकरींतून १९१४ सालीं ते मोकळे झाले—आणि त्याबरोबरच संसाराच्या साऱ्या जाळ्यां-तूनहि सुटले, निसटले.

म्हणजे सुमारें २३–२४ वर्षें त्यांनीं नोकरींत घालविलीं. मोठमोठ्या हुद्याच्या जागेवर कामें केलीं. पगारहि चांगला मिळवला. सामान्य व्यवहाराच्या डोळ्यांनीं बघितलें तर, इतक्या वर्षांच्या अवधींत त्यांना कुठेतरी कायम व्हावयाला हवें होतें. दोन पैसे गांठीला मारून राहायला हवें होतें. पण अमृतलालांचा पिंड सेवेचा होता, नोकरीचा नव्हता. वरीलपैकीं कांहीं नोकऱ्या त्यांच्या स्वाभिमानी बाण्यामुळें सुटल्या. कांहीं ते सचोटी सोडायला तयार न झाल्यामुळें सोडाव्या लागल्या. आणि शेवटची मुंबई नगरपालिकेची-म्युनिसिपालिटीची नोकरी? ती मात्र त्यांनीं आपण होऊन सोडली. यापुढें आपल्याला पोट भरण्यासाठीं नोकरीच्या बेडींत अडकून पडायचें नाहीं असें ठरवून सोडली. आतां कुटुंब-घर चालविण्यासाठीं पैसे मिळवीत बसायचें नाहीं म्हणून सोडली. वास्तविक त्या नोकरींत असतांना त्यांनीं केलेली कामगिरी सर्वांच्या डोळ्यांत भरली होती. पोरबंदर संस्थानाचे कारभारी तर म्हणत होते, 'दरमहा ५०० रुपयेच काय, अमृतलाल, तुम्ही आपल्या हातानें आंकडा लिहाल त्या पगारावर आम्ही तुम्हांला घेतों. मुख्य इंजिनिअरच्या जागेवर नेमतों.'—पण अमृतलालना नोकरीच करायची नव्हती. मग प्रश्न कुठे उरला! हो, त्यांना नोकरी करायची होती, पण ती

गरीबगुरिबांची. दीनदुबळ्यांची. रंजल्या-गांजल्यांची. त्यासाठीं त्यांचा जीव तळमळत होता. त्या वेळीं त्यांनीं आपल्या वडिलांना लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे :

> "आपण मला परवानगी द्याल तर मी या नोकरीच्या जंजाळांतून मोकळा होऊन आपला वेळ दलितांच्या सेवेंत घालवीन."


पुढें कांहीं दिवसांनीं हें वडिलांचें बंधनहि तुटून गेलें. विठ्ठलदास--म्हणजेंच अमृतलालचे वडील या जगाचा कायमचा निरोप घेऊन गेले. ते त्यागी होते. सेवेनें थोर झालेले होते. करारी होते पण तितकेच मायाळूहि होते. आणि आपले हे थोर सद्‌गुण ते आपल्या मुलांतहि ठेवून गेले होते.

हो, तें सांगायचें राहिलेंच. नव्हे, तें महत्त्वाचेंच सांगायचें राहून गेलें--ठक्करबाप्पांच्या कौटुंबिक स्थितीबद्दल. त्यांचें लग्न लहानपणींच झालें. त्यांना एक मुलगीहि झाली होती. पण ती फार दिवस जगली नाहीं. त्यांची पहिली पत्नी--या दुर्दैवी मुलीची आईसुद्धां त्या मुलीच्या पाठोपाठ कांहीं वर्षांनंतर देवाघरीं निघून गेली. अमृतलालनीं पुन्हां दुसरें लग्न केलें. त्या वेळीं त्यांचें वय ३९ वर्षांचें होतें. परंतु हा पुन्हां दुसऱ्यांदां थाटलेला संसारहि फार दिवस पुढें रेटला गेला नाहीं. त्यांची ही दुसरी पत्नीसुद्धां वर्ष-दोन वर्षांतच काळानें ओढून नेली. त्यांची पहिली पत्नी पुष्कळ दिवस अंथरुणावर पडून होती. दुसरीहि अशीच बरेच दिवस हॉस्पिटलमध्यें राहून वारली. संसाराचा मांड मांडण्याचा त्यांचा प्रयत्न यशाला गेला नाहीं. नव्हे, देवाच्या मनांतच तसें नव्हतें. स्वतः ठक्करबाप्पांनींच या बाबतींत आपले विचार प्रकट केलेले आहेत :

> "सन १९१२–१३ नंतर मी एकाकीच होऊन पडलों ......आणि पुढें पुढें त्यांत आनंदहि वाटूं लागला. बायको-मुलें नसल्याची खंत वाटेनाशी झाली, आणि

संसार सोडून देशसेवेच्या कामाला लागावें असें मनांत येऊं लागलें. यांत मला तरी ईश्वराच्या इच्छेशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. "

अशांकडे अनेक हजारों, लाखों दुःखी माणसांचे संसार सुखी करण्याची कामगिरी देवाला द्यावयाची असते. त्यांच्या संसाराची अशीच वाताहात तो करीत असतो कीं काय कोण जाणे ! तुकाराम महाराजांचें उदाहरण आपल्याला सगळ्यांना माहीत आहे. कितीतरी सन्तांचीं उदाहरणें अशींच आहेत. आणि ठक्करबाप्पांना तरी सन्त नाहीं म्हणायचें तर काय म्हणायचें ?



" जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।। "

–तोच साधु; तिथेच देवाचें राहणें असतें. त्या साधूंच्या मनांतला, त्या साधूंच्या अंतःकरणामधला देव त्यांना सतत सांगत असतो, सुचवीत असतो–' चल, कामाला लाग. आपल्या सुखांत रमून जाऊं नकोस. बायकापोरांत गुंतून पडूं नकोस. मला तुझ्याकडून मोठें काम करून घ्यायचें आहे. तुला तें करायलाच हवें.' असा देव सारखा त्यांच्या मागें लागलेला असतो.

## ६
## नवा प्रकाश

त्या वेळीं अमृतलालना दरमहा ३६० रुपये पगार मिळे. त्या काळचे म्हणजे पहिल्या लढाईच्या मागचे दिवस होते ते. ही बडी नोकरी सोडायची म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती. पण त्या नोकरींतच त्यांना नवा प्रकाश दिसलेला होता. त्यांच्याकडे काम होतें तें देखरेखीचें. मुंबई शहरांतील ठिकठिकाणचा कचरा रेल्वे गाडयांत भरून तो चेंबूरजवळ नेऊन टाकण्याच्या कामावर त्यांना देखरेख करावी लागे. हें काम करणारे २००–३०० अस्पृश्य, महार, भंगी लोक होते. त्यांत कित्येक महाराष्ट्रांतले होते तसेच कांहीं काठेवाडकडीलहि होते. हें काम प्रत्यक्ष मैला वाहून नेण्याच्या कामापेक्षांहि घाणेरडें असल्याचें ठक्करबाप्पांनीं म्हटलें आहे. कुजलेला कचरा, चिखल, गवत, झाडाचीं पानें, कागद, हॉटेलांतून इत्यादि फेकून दिलेलें अन्न, मूत्र इत्यादि सर्व किळसवाण्या वस्तूंची अती कुजट घाण उत्पन्न होई. ती इतकी असह्य होती कीं प्रसंगीं डोकें फुटून जाण्याची वेळ येई. परंतु पोटाला महाग झालेले ते बेकार हरिजन. त्यांना या कामाशिवाय दुसरा मार्गच नव्हता. आणि पोट भरण्यासाठीं असलें काम मिळविण्याकरितांहि त्यांना किती प्रयास पडत. केवढे वशिले लावावे लागत, लांच चारावी लागे !

हें सर्व ठक्करबाप्पा उघडया डोळयांनीं पाहात होते. तीं माणसें जगत असलेलें किळसवाणें जीवन त्यांना हरघडीं दिसत होतें. पुस्तकांत गरिबांचीं दुःखें वाचणें निराळें आणि तीं डोळयांनीं प्रत्यक्ष पाहणें निराळें. त्यांच्यांत मिळून मिसळून, त्यांच्याबद्दलच्या आस्थेनें तीं अगदीं जवळून निरखणें तर फारच निराळें. हीं अर्धपोटीं, अर्धनागवीं माणसें घाणेरडया जागीं राहून जीवन कंठीत होतीं. तें जीवन जगणारीं माणसें खालच्या दर्जाचीं, खालच्या वर्गाचीं होतीं. तरीपण तीं आपल्याच

देशाचीं, आपल्याच धर्माचीं लेकरें आहेत. ही जाणीव अमृतलालच्या मनाला केव्हांचीच होऊन चुकली होती. यांच्यासाठीं आपल्याला कांहींतरी केलेंच पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें. 'यांच्यासाठीं कांहींतरी केलें पाहिजे'—अमृतलालच्या मनांत उगवलेला हा एक लहानसा भावना-कोंब होता. या सेवाभावाच्या कोंबांतून हळुहळु मोठें झाड बनलें. तो प्रचंड वटवृक्ष एवढा फोंफावला, वाढला कीं त्याच्या थंड सावलींत लक्षावधि जीव येऊन विसांवले. त्यांत महार, मांग, धेड, भंगी, अस्पृश्य-हरिजन आहेत. तसेच दाट अंधाऱ्या जंगलांत आणि डोंगर-दऱ्यांत राहाणारे आपले आदिवासी-वनवासी भाऊहि आहेत. ओल्या दुष्काळांत बुडालेले आणि कोरड्या दुष्काळांत होरपळून निघालेले दुर्दैवी जीवहि त्यांत आहेत. इतकेंच काय पण नोआखलीसारख्या माणसांनीं उभारलेल्या नरकांत पिचणारीं कित्येक माणसेंहि त्यांत आहेत.

## संन्यास

अमृतलालचे 'ठक्करबाप्पा' झाले त्याची सुरुवात ही अशी होती. मुंबई नगरपालिकेची बडी नोकरी त्यांनीं सोडली. आणि दीनदुबळ्यांच्या सेवेसाठीं ते 'भारत सेवक समाज' ऽ या संस्थेंत दाखल झाले. त्या वेळीं त्यांना अनेक माणसांकडून विरोध सहन करावा लागला. मनाचा निश्चय ठाम ठेवावा लागला. त्या वेळीं—१९१४ सालीं—त्यांनीं लिहिलें आहे :

"मुंबई म्युनिसिपालिटीच्या नोकरीचा मीं राजिनामा दिला आहे. आणि येत्या २ तारखेपासून मी नोकरींतून मोकळा होऊन 'भारत सेवक समाजां'त दाखल होईन.

ऽ हा कै. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं स्थापन केलेला 'भारत सेवक समाज'; आतांचा नव्हे.

या बाबतींत मीं कोणाचाहि सल्ला घेतलेला नाहीं. मी केवळ माझ्या आंतल्या आवाजाच्या सल्ल्याप्रमाणें माझ्या अंतरात्म्याचा हुकूम अंमलांत आणून हें पाऊल टाकीत आहें. "

असें करायला मनाची केवढी तयारी लागते! बारीक सारीक गोष्टींतसुद्धां कांहीं ठरवायचें म्हणजे आपण किती बिचकतों. कितीदां माघार घेतों. हें करावें का, केलें तर चांगला परिणाम होईल का, असा किती विचार करतों. पण कांहीं माणसें खरोखरीच मोठीं असतात. त्यांचा एखाद्या गोष्टी-बाबतचा निकाल लगेच ठरतो. आणि ठरल्याबरोबर तो अंमलांतहि येतो. कसलीहि शंका, भीति मनांत आल्याशिवाय ते ती गोष्ट करून टाकतात. मग ती गोष्ट कितीहि लहान असो नाहींतर मोठी असो.

ठक्करबाप्पा करायला निघाले होते ती गोष्ट फार मोठी होती. अति कठीण होती. उदाहरणानेंच सांगायचें झालें तर–आपल्या हिंदु धर्माप्रमाणें संन्यास घेणें हें जितकें अवघड आहे, जितकें कठीण आहे तितकेंच अवघड व कठीण. 'आजपासून माझा कोणी नातेवाईक नाहीं. मला घर नाहीं, दार नाहीं. पैसा-अडका इतकेंच काय पण जात-घराणेंसुद्धां राहिलेलें नाहीं.' असें नुसतें तोंडानें म्हणायचें नव्हे, तर तशी मनाची खरोखरच तयारी करायची. म्हणजे हें कांहीं सोपें काम नव्हे. ठक्कर-बाप्पांनीं जें नवें व्रत घ्यायचें ठरवलें होतें तें या संन्यास घेण्या-प्रमाणेंच होतें जवळजवळ. ६ फेब्रुवारी १९१४ ला भारत सेवक समाजाचे संस्थापक कै. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं ठक्कर-बाप्पांना समाजाची शपथ दिली. त्यांत सुरुवातीलाच असें म्हटलेलें आहे :

" माझ्या विचारांत देश पहिल्यानें राहील. आणि माझ्या ठिकाणीं जें कांहीं उत्तम म्हणून असेल तें मी देशाच्या सेवेंत देऊन टाकीन. "

ठक्करबाप्पा असे हे संन्यासी बनले. त्यांनीं तें व्रत जन्मभर चालविलें. गांधीजींनींहि आपल्या 'नवजीवन' पत्रांत त्यांचा या शब्दांतच गौरव केलेला आहे :

> " भाई अमृतलाल ठक्कर आपला संन्यास सार्थ करीत आहेत. त्यांनीं भगवें वस्त्र अंगावर घातलेलें नाहीं. ते स्वत:ला संन्यासी म्हणवीतहि नाहींत. तरीपण ते जें काम करीत आहेत तें एखाद्या संन्याश्यालाच शोभण्यासारखें आहे. "

:

## चार गुरु

असें कोणतें काम केलें ठक्करबाप्पांनीं ? जाणते लोक त्यांना थोर समजतात. बाप्पांचें बापूंच्या म्हणजे गांधीजींच्या बरोबरीनें नांव घेतात. स्वत: गांधीजींनींच त्यांच्यासंबंधीं लिहिलें आहे. " बाप्पांच्या सेवेनें हिंदुस्थान देश प्रगत केला आहे."

मी सुरुवातीला सांगितलेंच कीं, ठक्करबाप्पांचें काम झळकफळक नव्हतें. त्यांत आरडाओरडा नव्हता, गाजावाजा नव्हता. शांतपणानें, अखंडपणानें स्वत: जळत राहून दुसऱ्यांना प्रकाश देणाऱ्या दिव्यासारखें तें होतें. उजेड असला म्हणजे अंधाराची आठवण आपल्याला नाहीं होत. पण अंधारांत चांचपडावें लागलें म्हणजे मात्र दिव्याची मातब्बरी काय आहे तें समजतें.

महाराष्ट्रांत कांहीं वर्षांपूर्वीं दुष्काळ पडून गेला. बंगाल्यांत पडलेल्या दुष्काळानें तर कित्येक लक्ष माणसें स्वाहा करून टाकलीं. अशा वेळीं त्या दुष्काळांत सांपडलेल्यांच्या मदतीला कोण धांवून जात असतें ? आज आपलें राज्य आहे— आपलें सरकार आहे म्हणून आपल्याला त्याचा आधार वाटतो. पण जेव्हां परक्यांचें राज्य, परकी सरकार इथे होतें तेव्हां ?

त्या वेळीं सरकारच्या तोंडाकडेहि पाहून भागत नव्हतें. त्यासाठीं रामकृष्ण मठ मिशनसारख्या किंवा भारत सेवक समाजासारख्या संस्थांचे कार्यकर्ते धांवून येत. लोकांच्या कल्याणाकरितां, त्यांच्या साह्याकरितां चाललेल्या संस्थाच अशा वेळीं पुढें होत असत. आपला हा देश गेलीं दीडशें वर्षें परक्यांच्या टांचेखालीं सांपडलेला होता. त्या वर्षांत कित्येक दुष्काळ पडले. त्या वेळीं अशा संस्थांची मदत नसती तर माणसें किडयामुंग्यांसारखीं मेलीं असतीं. ठक्करबाप्पांनीं भारत सेवक समाजाच्या वतीनें अशा दुष्काळांत लोकांना नेहमींच नाना तऱ्हांनीं मदत केलेली आहे. हें काम करण्याचा धडा त्यांना त्यांच्या वडिलांपासूनच मिळालेला होता. १९०० सालीं काठेवाड-गुजराथमधील दुष्काळांत ठक्करबाप्पांच्या वडिलांनीं मोठें काम केलेलें होतें. दारोदार हिंडून त्यांनीं पैसा जमविला आणि हजारों उपाशी जीवांना अन्न घालून जगविलें. त्यांचा अंतरात्मा संतुष्ट केला. आपल्या देशांत अन्नदानाचें महत्त्व पूर्वीपासूनच फार मोठें आहे. वडिलांना मिळालेला हा दुवा ठक्करबाप्पांच्या पाठीशीं होताच.

ठक्करबाप्पांनीं आपले चार गुरु मानले आहेत. त्यांत त्यांचे स्वतःचे वडील विठ्ठलदास हे पहिले गुरु. त्यांच्यापासून ते परोपकार शिकले, सेवावृत्ति शिकले. तसेंच वागण्यांतील टापटीप व व्यवस्थितपणाहि शिकले.

ठक्करबाप्पांचे दुसरे गुरु महाराष्ट्राचे एक कर्मवीर—विठ्ठल रामजी शिंदे. दलितांची सेवा हें विठ्ठल रामजी शिंदे यांचें आयुष्यांतलें मुख्य काम. आणि तीच त्यांची महत्त्वाकांक्षा. हरिजनांच्या उद्धाराची सुरुवात प्रथम यांनीं केली. स्वतः ठक्करबाप्पांनीं एके ठिकाणीं लिहून ठेवलें आहे : " माझ्या चार गुरूंपैकीं हे एक होते. आणि वडिलांच्या नंतर सार्वजनिक सेवेचें काम मी यांच्या पायापाशीं बसूनच शिकलों. " १९०६–७ सालीं ठक्करबाप्पा मुंबई नगरपालिकेच्या नोकरींत होते. तेव्हां त्यांच्या हाताखालीं २–३ शें महार, मांग, भंगी इत्यादि

मागासलेल्या जातीचे नोकर काम करीत असत. त्या वेळीं या दुसऱ्या गुरूपासूनच बाप्पा एक गोष्ट शिकले. या धेड-भंग्यांच्या व मांग-महारांच्या मुलांसाठीं शाळा कशा चालवाव्यात. त्यांना अधिकाधिक हक्क कसे मिळवून द्यावेत. याचे पाठ ठक्कर-बाप्पांनीं कर्मवीर शिंद्यांकडून घेतले होते.

त्यांचे तिसरे गुरु म्हणजे भारत सेवक समाजांतील एक नांवाजलेले कार्यकर्ते. श्री. देवधरदादा म्हणून ते ओळखले जात. मुंबईतील कार्यकर्त्यांत तेच प्रमुख होते. पुण्याची सेवासदन संस्था यांनीं स्थापन केली. यांच्याकडून बाप्पा एक नवीन गोष्ट शिकले. हरिजनांना त्यांच्या कर्जाच्या कचाटींतून कसें सोडवावें, यासंबंधींची कामगिरी त्यांनीं देवधरदादांच्या प्रेरणेवरूनच केली.

आणि त्यांच्या गुरुबद्दलच सांगतों आहें. तेव्हां त्यांच्या चौथ्या गुरूंचेंहि नांव लक्षांत ठेवायला कांहीं हरकत नाहीं. हे चौथे गुरुहि महाराष्ट्रांतलेच. पण त्यांचें नांव साऱ्या देशभर माहीत आहे. ते म्हणजे महर्षि धोंडो केशव कर्वे. स्त्रियांना शिक्षण देण्याचें काम प्रथम यांनीं हातीं घेतलें. आणि सतत चिकाटीनें खूप श्रम करून त्यांनीं तें तडीलाहि नेलें. महाराष्ट्रां-तल्या व बाहेर प्रांतांतल्याहि शेंकडों अनाथ, दुःखी स्त्रिया यांच्या या कामामुळें माणुसकीचें जीवन आज जगूं शकत आहेत.

ठक्करबाप्पांनीं हे चार गुरु केले. आणि ते स्वतः भिल्ल इत्यादि वनवासींचे आणि हरिजनांचे गुरु बनले. गांधीजींनींच ही पदवी त्यांना दिलेली आहे. त्या क्षेत्रांतल्या त्यांच्या कामाला खरोखरीच तोड नाहीं. परंतु त्याशिवाय दुष्काळ-निवारणाचें त्यांचें कार्यहि अति प्रचंड आहे. त्यांनीं केलेल्या कामगिरीची ओळख थोडी तपशीलवार करून घेऊं या.

# ३
## कामाचे डोंगर

१९१४ सालीं ते भारत सेवक समाजाचे रीतसर सभासद बनले. समाजाच्या वतीनें सुरुवातीलाच दुष्काळपीडितांच्या मदतीसाठीं त्यांची रवानगी झाली—ती युक्त प्रांतांत म्हणजें हल्लींच्या उत्तर प्रदेशांत. दुष्काळ म्हणजे काय असतें हें त्यांनीं त्यापूर्वींहि प्रत्यक्ष बघितलेलें होतें. नुसतें पुस्तकांत वाचलेलें नव्हतें. तर त्याचें भयंकर—भीषण दर्शन त्यांनीं स्वत:च्या डोळ्यांनीं घेतलेलें होतें ! संस्थानी नोकरींत असतांनाची ती गोष्ट आहे. दुष्काळामुळें लोकांना खायला कांहीं मिळत नव्हतें. म्हणून दुष्काळी कामें चालू झालीं होतीं. त्या ठिकाणीं कामावर आलेल्या माणसांपैकीं—कुटुंबापैकीं दोघें मजूर नवराबायको एकाएकीं मरून गेलीं. मागें त्यांचीं लहान मुलें होतीं. सर्वांत धाकटा मुलगा तान्हा—आठदहा महिन्यांचा व सर्वांत थोरला आठदहा वर्षांचा. त्या लहान वयाच्या थोरल्या मुलाला त्याच्या त्या अगदीं चिमकुल्या भावाचें काय करायचें कांहीं समजेना. त्याला कसें सांभाळायचें कांहीं कळेना. शेवटीं त्यानें काय केलें ?—त्यानें त्या तान्ह्या मुलाला चक्क जिवंत जमिनींत पुरून टाकलें ! बाप्पांनीं हें उदाहरण प्रत्यक्ष पाहिलेलें होतें.

बाप्पाचें मूळचें रक्त सेवेचें होतें. सेवेचें होतें तसेंच शिस्तीनें, योजना ठरवून, कसून काम करण्याचें होतें. त्यामुळें युक्त प्रांतांतल्या त्या वेळच्या दुष्काळांत त्यांची कामगिरी फार मोलाची ठरली. त्यापुढेंहि वारंवार त्यांना दुष्काळपीडितांच्या साह्याचें काम हातीं घ्यावें लागलें. त्यांत ते यशस्वी ठरले. पुढें पुढें तर जणू असें ठरूनच गेल्यासारखें झालें—दुष्काळाचा घाला देशांत कुठेंहि पडला कीं बाप्पांनींच तिथे जायचें. त्या दुष्काळाच्या खाईंत सांपडलेल्या दुर्दैवी माणसांना तो देवच भेटल्यासारखें व्हायचें. बाप्पांचेंहि काळीज त्यांच्याबद्दलच्या कणवेनें कांठोकांठ

दा. क्र ... नों. दि



भरून जायचें. आसामच्या दुष्काळांत लोकांची फारच केविलवाणी स्थिति झाली. लोकांचे प्रेमी नि कनवाळू बाप्पा तें पाहून खरोखरीच रडले. पण त्यांचें रडणें निराळें; इतरांचें निराळें. लोकांचें दु:ख पाहून त्यांच्या डोळ्यांतून आसवें लोटलीं तरी त्या लोंढ्यांत ते कधीं वाहून जायचे नाहींत. अशा वेळीं डोकें ताळ्यावर ठेवून योजना आंखून काम करायला पाहिजे असतें. बाप्पा तें शांतपणें ठरवीत. आणि त्याप्रमाणें एकदां कामाला लागले कीं स्वत:चा जीव गहाण टाकूनहि ते रात्रंदिवस काम करीत. त्यांच्या काळजांत करुणा असली तरी कामांत मात्र कठोरपणा असे. मग ते कोणाहि कार्यकर्त्याला कामांत कसूर म्हणून करूं द्यावयाचे नाहींत. शिस्तींत जरा इकडे तिकडे केलेलें त्यांना खपायचें नाहीं. आणि ते तसे वागले म्हणूनच एवढीं राक्षसी वाटणारीं कामें त्यांना पार पाडतां आलीं.

१९१९ मध्यें गुजराथमधील पंचमहाल जिल्ह्यांत दुष्काळ पडला. त्याची पाहणी करण्यासाठीं ठक्करबाप्पा हिंडले. त्या वेळीं तेथील भिल्ल लोकांची दु:स्थिति त्यांच्या डोळ्यासमोर आली. त्या पाहणींतूनच 'भिल्ल सेवा मंडळा' ची स्थापना झाली.

१९२० सालांत ओरिसा प्रांतांत भयंकर दुष्काळ पडला. बाप्पांनीं तिथे जाऊन लोकांच्या मदतीचें कार्य उत्तम प्रकारें केलें.

१९१८ पासून १९४४ पर्यंत देशांत दुष्काळाच्या राक्षसानें अनेकदां व अनेक ठिकाणीं आ पसरला. बाप्पा आपल्या साऱ्या बळानिशीं तिथे तिथे जाऊन उभे राहिले. आपल्या बुद्धिसर्वस्वानें त्यांनीं त्या राक्षसावर मात केली. त्यासाठीं त्यांना कधीं कोणी बोलावणें करावें लागत नसे कीं विनंती करावी लागत नसे. आपलें मूल आजारी आहे असें कळतांच आई कशी धांवून जाते. हातांत असेल तें काम टाकून आपल्या लेकराकडे धांव घेते. तसेंच बाप्पांचें होतें.

१९४३–४४ सालीं त्यांनीं याबाबतींत केलेल्या कामगिरीनें खरोखरी देवसुद्धां थक्क होऊन गेला असेल. त्या सुमारास देशांत जवळजवळ सगळीकडेच दुष्काळाचे चटक बसत होते. प्रमाण कमी अधिक इतकेंच. पण त्यांतल्या त्यांत बंगाल प्रांत या आगींत सर्वांत अधिक होरपळून निघाला. जवळजवळ ३५ लाख माणसें–हो, जिवंत, हाडामासाचीं, खरींखुरीं, चालतींबोलतीं ३५ लाख माणसें–या बंगालच्या दुष्काळांत अन्न अन्न करून मेलीं. त्या या भयंकर दुष्काळांत बाप्पा दूर कसे राहातील ? सकाळीं ६ पासून रात्रीं ११–११, १२–१२ वाजेपर्यंत ते या कामीं सारखे खपत होते. प्रसंगीं झोंप आणि अन्नपाणीहि बाजूला सारून ते काम करतांना दिसत. बरोबरचे लोक श्रमांत कमी पडले. पण म्हातारे बाप्पा एखाद्या पहाडासारखे कामाला उभे राहिले. त्या वेळीं त्यांचें वय पाऊणशें

वर्षांचें होतें. त्या वेळीं दुहेरी काम होतें. दुष्काळी भागांतील दु:खितांना साह्य करणें हें एक. आणि तितकेंच महत्त्वाचें काम म्हणजे तेथील खरी परिस्थिति देशाला समजावून सांगणें. तें काम करतांना त्यांच्यावर सरकारचा राग ओढवला. कारण सरकारची बेफिकिरी त्यांनीं चव्हाटयावर आणली. खूप श्रमानें त्यांनीं सगळी आंकडेवारी गोळा केली. आणि सरकारच्या रागाला भीक न घालतां ती प्रसिद्धहि करून टाकली. त्यामुळें अर्थातच बंगाल्यांत खरोखरी काय घडतें आहे हें लोकांना समजलें. सरकारची नालायकी उघड झाली. याशिवाय अनेक दुष्काळांच्या बाबतींत तर असेंहि घडलेलें आहे. बाप्पांनीं आंकडेवारी जमवून खरी परिस्थिति जाहीर करावी. तेथील सरकारी अधिकाऱ्यांची ढिलाई, हलगर्जीपणा व उद्दामपणा उघड करून सांगावा. तेव्हां मग सरकारचे डोळे उघडून सरकारी मदत दुष्काळी भागांत जाऊं लागावी.

असल्या कामाची त्यांना किती तळमळ होती पाहा. १९५० च्या ऑगस्टमध्यें आसाम प्रांतांत भयंकर भूकंप झाला. इतिहासांत लिहून ठेवण्याइतका तो भयंकर होता. त्या वेळीं बाप्पांनीं ऐंशीचा उंबरा ओलांडला होता. त्यांतच ते आजारी पडून अंथरुणाला खिळलेले होते. खोलींतल्या खोलींतसुद्धां आपल्या पायांनीं हिंडण्याची ताकद त्यांच्यांत नव्हती. अशा अवस्थेंत आसामच्या धरणीकंपाची बातमी त्यांच्या कानावर पडली. आणि त्यांचेंहि काळीज हादरलें. त्या निराधार लोकांच्या काळजीनें ते अस्वस्थ होऊन गेले. पण अस्वस्थ होऊन स्वस्थ मात्र बसले नाहींत. बसल्याबसल्याच त्यांनीं आपल्या पद्धतशीर कामाला सुरुवात केली. आणि अवघ्या १५-२० दिवसांत निवडक नऊ कार्यकर्ते त्यांनीं तिकडे रवाना केले. नुसते कार्यकर्ते रवाना करूनहि ते स्वस्थ बसले नाहींत. तर त्यांचा सर्व दृष्टीनें पाठपुरावा ते भावनगरमध्यें रुग्णशय्येंत पडल्या पडल्यासुद्धां करीत राहिले.

ठक्करबाप्पांनीं केलेल्या कामाचे ढीग एकेक डोंगराएवढे आहेत. किती वर्णन करून सांगणार? विशाल सागराच्या अफाट पाण्याचें मोजमाप कधीं कुणी केलें आहे का ?

## बाप्पा–एक संस्था

दुष्काळ निवारणाच्या कार्याशिवाय दुसऱ्या क्षेत्रांतहि त्यांनीं कामगिरी केलेली आहे. विठ्ठलभाई पटेलांनीं सक्तीच्या शिक्षणासंबंधींच्या कायद्याचें बिल मांडलें. त्याला बाप्पांची मोठी मदत होती. त्यांनीं त्यासाठीं लागणारी आंकडेवारी खूप हिंडून व काम करून तयार करून दिली. याशिवाय अहमदाबाद, जमशेदपूर इत्यादि ठिकाणीं कामगारांच्या हितासाठीं ते झटले. त्यांची ती कामगिरीहि लक्षांत राहण्यासारखी आहे.

१९२६ मध्यें ते भावनगर प्रजा परिषदेचे अध्यक्ष निवडलें गेले. त्यानंतर पुढें अनेक वर्षें त्यांनीं संस्थानी प्रजेचें काम केलें. त्यांचीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगलीं, आणि राजे-महाराजांच्या जुलूम-जबरदस्तीला सतत वाचा फोडली. पतियाळा संस्थान म्हणजे त्या काळीं जुलमाचें आगर झालें होतें. ह्या संस्थानाच्या महाराजांनीं केलेल्या अनन्वित अत्याचारांना तोंड कोण फोडणार? तें काम ठक्करबाप्पांच्या शिरावर येऊन पडलें. आणि तें महत्त्वाचें काम त्यांनीं उत्तम प्रकारें पार पाडलें. त्यांत त्यांचें धैर्य, निर्भीडपणा इत्यादि गुण देशाच्या पुन्हां नजरेसमोर आले. या हालचालीमुळें ते कांहीं काळ राजकारणांत दिसले. तरी राजकारण हें त्यांचें क्षेत्र नव्हतें. त्यांचें क्षेत्र होतें सेवाकार्याच्या संघटनेचें.

म्हणूनच गांधीजींनीं एक मोठी जबाबदारी त्यांच्यावर आग्रहानें सोंपविली. हरिजन सेवक संघाचें चिटणीसपद त्यांच्याकडे दिलें. तोंवर भिल्ल सेवा मंडळाचें काम हेंच ठक्करबाप्पांच्या

दृष्टीनें महत्त्वाचें होतें. त्यासाठींच त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें होतें. तथापि हरिजनांचा उद्धार हीहि देशाच्या दृष्टीनें फार महत्त्वाची गोष्ट होती. गांधीजींशीं परोपरीनें वाद केल्यावर ठक्करबाप्पांनाहि तें पटलें. आणि पटलें तेव्हांच त्यांनीं तें काम स्वीकारलें. एकदां जेव्हां त्यांनीं तें हातीं घेतलें तेव्हां तें त्यांनीं कुठच्या कुठे नेऊन ठेवलें. किती नांवारूपाला आणलें. गांधीजींसह त्यांनीं या कामासाठीं देशभर प्रवास करून जागृति घडवून आणली. आणि थोडक्यांत म्हणावयाचें तर हरिजनांना माणसांत आणलें. गांधीजींनीं पुढाकार घेऊन बाप्पांच्या सत्तराव्या वाढदिवशीं त्यांना ७०००० रुपयांची थैली भेट देवविली. भिल्लांप्रमाणेंच हरिजनांनाहि ते वडिलांच्या ठिकाणीं झाले असल्याचें गांधीजींनीं याच वेळीं म्हटलें आहे. हरिजनांचा त्राता म्हणून खरोखरी जर कोणाचीं नांवें घ्यावयाचीं असतील–तर बाप्पांचें नांव त्यांत सुरुवातीलाच घ्यावें लागेल. इतके ते हरिजनांच्या भल्यासाठीं खपलेले आहेत.

१९३५सालीं नव्या कायद्याप्रमाणें काँग्रेसी मंत्रीमंडळें अधिकारावर आलीं. त्यांपैकीं अनेक प्रांतांतल्या सरकारांनीं बाप्पांना बोलावलें. आपापल्या प्रांतांतील हरिजन, आदिवासी इत्यादि मागासलेल्यांची पाहणी करण्याची विनंति केली. तें काम बाप्पांनीं कसोशीनें केलें. पुढें स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याचें काम आलें. तेव्हां आदिवासींबाबतच्या समितीवर त्यांना अध्यक्ष नेमण्यांत आलें. त्या वेळीं बाप्पांनीं पुन्हां देशभर दौरा केला. आदिवासींच्या प्रत्येक भागांत ते हिंडले. त्यांनीं आपला अहवाल सरकारकडे दिला. त्यावरून आदिवासींच्या रक्षणाची व सर्व प्रकारच्या कल्याणाची कायमची कायदेशीर तरतूद करण्यांत आली. भारतीय आदिम जाती सेवक संघ स्थापन झाला. राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं त्याचें अध्यक्षपद स्वीकारलें. या कामाला अखिल भारतीय स्वरूप मिळालें. याचेंहि श्रेय खरोखरी बाप्पांनाच आहे. भिल्ल सेवा मंडळाचें

रोपटें त्यांनीं १९२२ सालीं आपल्या हातांनीं लावलें. त्या रोपट्यांतूनच ही एवढी मोठी बाग फुलली–आदिवासींच्या सेवाकार्याची.

याशिवाय बाप्पा कस्तुरबा स्मारक निधीचे अध्यक्ष होतेच. आणि तसेंच भारतीय सेवक समिती व भारतीय कल्याण कार्य परिषद यांच्याहि कारभाराचें ओझें ते स्वतःच्या डोक्यावर वाहात होते.

त्यांनीं केलेल्या देशाच्या कामासंबंधीं किती सांगावें तेवढें थोडेंच आहे. " आपल्या देशांतील आदिवासी व मागासलेल्या जातींना सेवेची फार जरुरी आहे. ठक्करबाप्पांनीं त्यांची सेवा कित्येक वर्षं सतत केलेली आहे. त्या सेवेनें ते स्वतः एक संस्थाच बनून गेले आहेत. " पं. जवाहरलाल नेहरूंनीं बाप्पां-संबंधीं असें म्हटलें आहे. आज हरिजनांच्या बाबतींत देशांत पुष्कळ सुधारणा घडल्या आहेत. अस्पृश्यता कायद्यानें गेली आहे. याचेंहि श्रेय ठक्करबाप्पांच्या निरलस सेवेलाच द्यावें लागेल. हरिजन व आदिवासी यांच्यासाठीं त्यांनीं जें केलें तें पूर्वीं कोणी केलेलें नव्हतें. यापुढेंहि इतिहासांत तें काम सोन्याच्या अक्षरांनीं लिहिलें जाईल. कारण त्याचा परिणाम आपल्या पुढच्या पिढ्यांवरहि होणार आहे.

बाप्पा केंवढे थोर पुरुष होते !–पण ते राहात कसे, वागत कसे हें कुठे आपण अजून पाहिलें आहे ? तें पाहिल्याशिवाय ठक्करबाप्पांचें मोठेपण आपल्या मनावर ठसणार नाहीं. आणि त्यांच्या या समुद्राएवढा कार्याचें गुपीतहि समजणार नाहीं. पंढरीच्या पांडुरंगाचें दर्शन घ्यायचें म्हणजे नुसतें चंद्रभागेचें वाळवंट पाहून चालत नाहीं. नुसतें देवळाचें शिखर बघून भागत नाहीं. त्यासाठीं देवळांत आंत जाऊन प्रत्यक्ष पांडुरंगासमोर उभें राहावें लागतें. कटिवर हात देऊन विटेवर उभें असलेलें त्याचें साजरें रूप डोळ्यांनीं न्याहाळावें लागतें. तसेंच हेंहि आहे–

८

## कडक आणि कोमल

बाप्पा धिप्पाड होते. चांगले तगडे व मजबूत होते. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून वाटायचें कीं वागायला मोठा कडक माणूस असला पाहिजे. हें वाटणें कांहीं चुकीचें नव्हतें. एखाद्या लष्करी सेनापतीसारखी त्यांची शिस्त कडक असे. ते स्वतःशींहि कडक वागत. आणि दुसऱ्यालाहि वागवायला मागेंपुढें पाहात नसत. मात्र तें कामासाठीं; स्वतःच्या सोयीसाठीं कधींहि नाहीं. ते म्हणतच—" मी फार तापट. वडिलांपासून हा गुण माझ्याकडे आला. तरीपण मी माझ्या तापटपणाला आळा घालण्याचा नेहमीं प्रयत्न केला. तो पुष्कळ यशस्वीहि झाला. " कामाच्या बाबतींत बाप्पा फार कडक असत. ते प्रत्येक क्षणाचा हिशोब देणारे व घेणारेहि होते. त्यांना लटपटपंची आणि देखावा मुळीसुद्धां खपायचा नाहीं.

आसाम प्रांतांत १९५० सालीं फार मोठा भूकंप झाला. त्या ठिकाणीं सेवाकार्याकरितां जाण्यासाठीं त्यांनीं कांहींना विचारलें. जे जायला तयार झाले त्यांना त्यांनीं स्पष्ट बजावलें आहे. " प्रत्येक कार्यकर्त्यानें कृपा करून हें लक्षांत ठेवावें. प्रत्ये-काला आसामांत पुरे ९० दिवस सेवाकाम करावें लागेल. शक्य असेल तर ९० दिवसांपेक्षां अधिक दिवस काम केलेलें चालेल. परंतु कोणत्याहि परिस्थितींत या मुदतींत एक दिवसाचीहि सूट मिळणार नाहीं. "

कामाच्या बाबतींत ते कडक होते खरे. पण अंतःकरणाचे इतके कोमल कीं गरिबांचीं दुःखें पाहून त्यांचे डोळे पाण्यानें भरून यायचे. शेंबडयालेंबडया, खरजेनें भरलेल्या, उघडया नागडया भिल्ल पोरांना त्यांनीं आपल्या हातांनीं आंघोळ घालावी. त्यांच्या जखमा स्वच्छ धुवाव्यात. त्याला मलमपट्टी करून त्यांना

रोपटें त्यांनीं १९२२ सालीं आपल्या हातांनीं लावलें. त्या रोपट्यांतूनच ही एवढी मोठी बाग फुलली–आदिवासींच्या सेवाकार्याची.

याशिवाय बाप्पा कस्तुरबा स्मारक निधीचे अध्यक्ष होतेच. आणि तसेंच भारतीय सेवक समिती व भारतीय कल्याण कार्य परिषद यांच्याहि कारभाराचें ओझें ते स्वत:च्या डोक्यावर वाहात होते.

त्यांनीं केलेल्या देशाच्या कामासंबंधीं किती सांगावें तेवढें थोडेंच आहे. "आपल्या देशांतील आदिवासी व मागासलेल्या जातींना सेवेची फार जरुरी आहे. ठक्करबाप्पांनीं त्यांची सेवा कित्येक वर्षें सतत केलेली आहे. त्या सेवेनें ते स्वत: एक संस्थाच बनून गेले आहेत." पं. जवाहरलाल नेहरूंनीं बाप्पांसंबंधीं असें म्हटलें आहे. आज हरिजनांच्या बाबतींत देशांत पुष्कळ सुधारणा घडल्या आहेत. अस्पृश्यता कायद्यानें गेली आहे. याचेंहि श्रेय ठक्करबाप्पांच्या निरलस सेवेलाच द्यावें लागेल. हरिजन व आदिवासी यांच्यासाठीं त्यांनीं जें केलें तें पूर्वीं कोणी केलेलें नव्हतें. यापुढेंहि इतिहासांत तें काम सोन्याच्या अक्षरांनीं लिहिलें जाईल. कारण त्याचा परिणाम आपल्या पुढच्या पिढ्यांवरहि होणार आहे.

बाप्पा केवढे थोर पुरुष होते !–पण ते राहात कसे, वागत कसे हें कुठें आपण अजून पाहिलें आहे ? तें पाहिल्याशिवाय ठक्करबाप्पांचें मोठेपण आपल्या मनावर ठसणार नाहीं. आणि त्यांच्या या समुद्राएवढा कार्याचें गुपीतहि समजणार नाहीं. पंढरीच्या पांडुरंगाचें दर्शन घ्यायचें म्हणजे नुसतें चंद्रभागेचें वाळवंट पाहून चालत नाहीं. नुसतें देवळाचें शिखर बघून भागत नाहीं. त्यासाठीं देवळांत आंत जाऊन प्रत्यक्ष पांडुरंगासमोर उभें राहावें लागतें. कटिवर हात देऊन विटेवर उभें असलेलें त्याचें साजरें रूप डोळ्यांनीं न्याहाळावें लागतें. तसेंच हेंहि आहे—


९

## कडक आणि कोमल

बाप्पा धिप्पाड होते. चांगले तगडे व मजबूत होते. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून वाटायचें कीं वागायला मोठा कडक माणूस असला पाहिजे. हें वाटणें कांहीं चुकीचें नव्हतें. एखाद्या लष्करी सेनापतीसारखी त्यांची शिस्त कडक असे. ते स्वत:शींहि कडक वागत. आणि दुसऱ्यालाहि वागवायला मागेंपुढें पाहात नसत. मात्र तें कामासाठीं; स्वत:च्या सोयीसाठीं कधींहि नाहीं. ते म्हणतच–" मी फार तापट. वडिलांपासून हा गुण माझ्याकडे आला. तरीपण मी माझ्या तापटपणाला आळा घालण्याचा नेहमीं प्रयत्न केला. तो पुष्कळ यशस्वीहि झाला. " कामाच्या बाबतींत बाप्पा फार कडक असत. ते प्रत्येक क्षणाचा हिशोब देणारे व घेणारेहि होते. त्यांना लटपटपंची आणि देखावा मुळीसुद्धां खपायचा नाहीं.

आसाम प्रांतांत १९५० सालीं फार मोठा भूकंप झाला. त्या ठिकाणीं सेवाकार्याकरितां जाण्यासाठीं त्यांनीं कांहींना विचारलें. जे जायला तयार झाले त्यांना त्यांनीं स्पष्ट बजावलें आहे. " प्रत्येक कार्यकर्त्यानें कृपा करून हें लक्षांत ठेवावें. प्रत्ये-काला आसामांत पुरे ९० दिवस सेवाकाम करावें लागेल. शक्य असेल तर ९० दिवसांपेक्षां अधिक दिवस काम केलेलें चालेल. परंतु कोणत्याहि परिस्थितींत या मुदतींत एक दिवसाचीहि सूट मिळणार नाहीं. "

कामाच्या बाबतींत ते कडक होते खरे. पण अंत:करणाचे इतके कोमल कीं गरिबांचीं दु:खें पाहून त्यांचे डोळे पाण्यानें भरून यायचे. शेंबड्यालेंबड्या, खरजेनें भरलेल्या, उघड्या नागड्या भिल्ल पोरांना त्यांनीं आपल्या हातांनीं आंघोळ घालावी. त्यांच्या जखमा स्वच्छ धुवाव्यात. त्याला मलमपट्टी करून त्यांना



प्रेमानें पोटाशीं धरावें. इतकें प्रेम त्यांच्यापाशीं नसतें तर लोकांनीं हें दृश्य कसें पाहिलें असतें !

हें एक लहानसें उदाहरण पाहा. एकदा ते चालले होते कोणत्या तरी काँग्रेस-अधिवेशनासाठीं. वाटेंत अलाहाबाद स्टेशनावर आगगाडी थांबली. तिथे त्यांना एक मुलगा भेटला. त्या बिचाऱ्याचे कपडेलत्ते, बिछाना सारें कांहीं चोरीला गेलें होतें. त्याच्या मनांत तर काँग्रेस-अधिवेशनासाठीं हजर राहाण्याची फार इच्छा होती. तेव्हां बाप्पांनीं आपल्याजवळचे कपडे आणि घोंगडी देऊन टाकली एकदम त्या मुलाला. म्हणाले,

"जा, कांहीं वाईट वाटून घेऊं नकोस कपडे गेल्याबद्दल." दयेनें त्यांचें काळीज इतकें तोंडोतोंड भरलेलें होतें.

आपल्याला वाटतें कीं मोठीं कामें करणारे, सतत देशभर हिंडत राहाणारे बाप्पा. त्यांचे कपडे किती असतील. त्यांना मोटारी सारख्या हाताशीं लागत असतील. ते वरच्या वर्गाच्या डब्यांतून आरामशीर प्रवास करीत असतील.

बाप्पांनीं हरिजनांचें काम हातीं घेतलें. तेव्हांपासून त्यांना खूपच हिंडावें लागलें. पण तो सारा प्रवास ते तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून करीत. एखादे वेळीं कांहीं खास सरकारी कामकाज असलें तर तेवढ्यापुरतेच ते वरच्या वर्गानें जात. बाकी तिसऱ्या वर्गाच्या–'थर्ड क्लास'च्या धकाधकींतच त्यांना बरें वाटे. ते साऱ्या हिंदुस्थानाच्या–भारताच्या हरिजन सेवक संघाचे चिटणीस होते. त्यामुळें त्यांना स्वतःसाठीं मोटार ठेवणें सहज शक्य होतें. त्यांना वास्तविक त्याची गरजहि होती. बिर्ला शेठसारखी मंडळी 'मोटार घ्या' म्हणून आग्रहहि करीत होती. तरीपण त्यांनीं मोटार घेण्याचा विचारहि कधीं केला नाहीं.

अंगावरचे कपडे म्हणजे एक लांब कोट, कुडतें, टोपी व धोतर. सर्व कपडे जाडे-भरडे खादीचे आणि त्याचेहि फक्त दोन-तीन जोड.

त्यांच्या पैशाच्या व्यवहाराबद्दल काय सांगावें ? त्यांना मुंबई म्युनिसिपालिटीच्या नोकरींत चांगला पगार होता. कांहीं शेंकडे दरमहा घरांत येत. तेव्हांपासूनच त्यांतला बराच भाग गरिबांच्या मदतीसाठीं खर्च व्हायला लागला होता. पुढें ते भारत सेवक समाजाचे सभासद झाले. समाजाच्या नियमाप्रमाणें त्यांना दरमहा ८० रुपये मिळत. त्यांचीहि तीच गत होत असे. या ८० रुपयांपैकीं निदान तिसरा हिस्सा गरजू गरिबांना दिला जाई. त्यापेक्षां अधिक लागला तर तोहि खर्च या पगारांतून होई. आपल्या कचेरींतला कोणी माणूस आजारी पडला किंवा दुसऱ्या कांहीं अडचणींत सांपडला. मग त्याला मदतीचा हात

पुढें करणें हें आपलेंच काम आहे असें ते समजत. आणि त्याप्रमाणें वागत. हें त्यांचें व्रत आयुष्याच्या अखेरपर्यंत असेंच चालू होतें. बाप्पा १९ जानेवारी १९५१ रोजीं आपल्यांतून कायमचे निघून गेले तेव्हां त्यांच्या खात्यांत किती शिल्लक होती ? त्यांनीं जन्मभर आपल्या देशबांधवांसाठीं, गरीब-गुरिबांसाठीं, दीनदु:खितांसाठीं लाखों रुपये गोळा केले. त्यांच्या स्वत:च्या खात्यांतली अखेरची शिल्लक होती–५४ रु. १५आणे ६पै.

## असे सेवक हवेत

ठक्करबाप्पा ब्यायशीं वर्षांचे होऊन वारले. काम करतां करतां कामीं आले. जसा खरा जातिवंत लढवय्या लढाईच्या मैदानावर शत्रूशीं लढतां लढतां कामीं येतो. सेवा– विशेषत: हरिजन, आदिवासी, गरीब, गांजलेले, संकटांत सांपडलेले, मागासलेले यांची सेवा. हेंच त्यांचें लढाईचें मैदान. त्यांत त्यांनीं त्यांच्या अज्ञानाशीं, दारिद्र्याशीं, दुबळेपणाशीं, दुष्काळाशीं लढाई केली. त्यांना आपल्या अपार श्रमांनीं जिंकलें. पद्धतशीर कामानें हार खायला लावली. चिकाटीच्या जोरावर पळावयास लाविलें. त्याकरितां त्यांना जन्मभर कष्ट करावे लागले. स्वत:चा संसार त्यांना नव्हता. लक्षावधि देशबंधूंचे व बहिणींचे संसार स्वत:चेच समजून त्यांना त्याची काळजी घ्यावी लागली. भिल्ल सेवा मंडळ हें तर त्यांच्या कुटुंबासारखेंच. त्यांतले एकेक कार्य-कर्ते म्हणजे नि:स्वार्थी सेवेचा उत्कृष्ट आदर्श. श्री. मगनलाल मेहता, श्री. लक्ष्मीदास श्रीकान्त, श्री. पांडुरंग गोविंद वणीकर इत्यादि मंडळी ही खरोखरीच सेवावीर. ठक्करबाप्पांच्या तालमींत तयार झालेली. आजहि त्यांनीं बाप्पाचें सेवा-व्रत पुढें चालू ठेवलेलें आहे. बाप्पांनीं पेटविलेल्या ज्योतीचा प्रकाश आजहि ते देशभर पसरवीत आहेत.

सेवेंत असलेल्या कोणाहि कार्यकर्त्यांची अडचण ती बाप्पांची अडचण. त्यांच्या कोणाच्याहि घरचीं दुःखें तीं बाप्पांचीं दुःखें. घरांतला कर्ता माणूस आपुलकीनें व प्रेमानें आपल्या मुलाबाळांचें व नातेवाइकांचें रक्षण करतो. बाप्पाहि त्याप्रमाणेंच करीत.

त्यांना आवड कसली असेल तर फक्त सेवेची—कामाचीच. गांधीजींनीं त्याबद्दल लिहिलें आहे :

> " ठक्करबाप्पासारखा कार्यकर्ता लाखांत मिळायचा नाहीं. त्यांना देखावा माहीत नाहीं. स्तुतीची त्यांना जरूर नाहीं. त्यांचें काम म्हणजेच त्यांचें सर्वस्वीं समाधान आणि तोच त्यांचा विरंगुळा."

पंचाहत्तरीच्या घरांत आले तरी त्यांची काम करण्याची हिंमत कांहीं कमी झाली नव्हती. तें पाहून त्यांना त्यांच्या एका सहकाऱ्यानें विचारलें, " बाप्पा, इतक्या म्हातारपणींसुद्धा एवढें काम करण्याची ताकद तुमच्यांत कशी आहे ? याचें गुपीत तरी काय आहे ?" त्यावर बाप्पांनीं दिलेलें उत्तर असें आहे :

> " कामावर भक्ति. ज्यांना मी आदर्श मानतों त्याच्याशीं इमानदारी. आणि बळकट इच्छाशक्ति. यामुळें मी काम करूं शकतों. यामुळें मला थकल्यासारखें वाटत नाहीं."

असें होतें म्हणूनच वयाच्या ब्यायशींव्या वर्षांपर्यंत-आयुष्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत ते काम करीत राहिले.

बाप्पांच्या सत्तराव्या वाढदिवशीं त्यांच्या चाहत्यांनीं एक मोठा समारंभ योजला. त्यांना ७०००० रुपयांची थैली देण्याचें ठरविलें. तें समजलें तेव्हा बाप्पा म्हणाले :

> " मला सत्तर हजार रुपयांची गरज नाहीं. तुम्ही जर या सत्तर हजार रुपयांऐवजीं मन लावून काम करणारे खरेखुरे सत्तर कार्यकर्ते शोधून काढतां तर मला फार आनंद झाला असता."

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ३२ ६७०४ नों. दि ..........
वि. ५।१५।... क्र. ...............



त्यांनीं मुंबईची बड्या पगाराची नोकरी सोडली, त्याबरोबरच स्वत:च्या संसारावरहि तुळशीपत्र ठेवलें. भारत सेवक समाजांत सेवाकार्यासाठींच दाखल व्हायचें ठरविलें. त्या वेळीं त्यांनीं मित्रांना लिहिलेलें पत्र काळीज हालविणारें होतें :

> " माझी अशी खात्री होऊन चुकली आहे कीं, भारताला आपण आपलें सारें आयुष्यच्या आयुष्य अर्पण करून टाकणाऱ्या सेवकांची जरूरी आहे. फुरसतीनें किंवा सोयीनें काम करणारांची नव्हे ! आणि जोंपर्यंत जन्मभर अशा तऱ्हेनें काम करणारे सेवक देशाला लाभणार नाहींत तोंपर्यंत आपली कांहींहि प्रगति होणार नाहीं. खरें काम करणारांसाठीं पैशाचे खजिने भरलेले आहेत."

——बाप्पा, जणूं हा प्रश्न आपल्या सर्वांना करीत आहेत. आपल्यापैकीं कोणी आहे का बाप्पांच्या या हांकेला ओ द्यायला पुढें येईल असा ?



IRBK-0106245